
थरार कथा
मोहन रावळ
परी प्रकाशन

थरार कथा

◆


© सुरक्षित

◆

प्रकाशक :
परी प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆

प्रमुख वितरक
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

मुखपृष्ठ :
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

◆

मुद्रक :
जयंत प्रिंटरी

◆

आवृत्ती :
२९ ऑगस्ट, २०१३

◆

किंमत :
रुपये १२०/-

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | भूत बंगला | ३ |
| २. | गमत्याची भूतचेष्टा | १३ |
| ३. | भुतांचा न्याय | २२ |
| ४. | भुताला हिसका | ३२ |
| ५. | बाहुल्यातील भूत | ३८ |
| ६. | एकाच चेहऱ्याची भुतं | ४७ |
| ७. | कपाटातील बुटके भूत | ५६ |
| ८. | खोजा आणि होजा | ६५ |
| ९. | चिनी मांत्रिक | ७४ |
| १०. | हडळ भेटली वाटेत | ८४ |
| ११. | खोट्याच्या माथी सोटा | ९० |
| १२. | एकलम खाजा, वाजव बाजा | १०० |
| १३. | मग काय झालं? | १०८ |
| १४. | मृत्यूदेवता | ११७ |
| १५. | सुंदरीचं भूत | १२५ |
| १६. | टीनाला भेटली मीना | १३५ |
| १७. | रामपूरची सती | १४४ |



# भूत बंगला

राजाभाऊ देशपांडे हुशार होते, धाडसी होते. नुकतेच ते नोकरीतून निवृत्त झाले होते. त्यांचा मुलगा अमेरिकेत नोकरीला होता. त्यांनीही भरपूर पैसा मिळवला होता. एकट्या जिवाला कितीसे लागते! ते स्वत: उत्तम व्हायोलिन वाजवायचे. वाचनाचाही त्यांना नाद होता.

त्यांना शहराबाहेर निवांत अशा ठिकाणी बंगला हवा होता. म्हणून त्यांनी वर्तमानपत्रात जाहिरात दिली. 'निवांत रम्य ठिकाणी सर्व सोयीचा बंगला विकत हवा आहे. संपर्क– राजाभाऊ देशपांडे, फोन – २२६४१४४.' परंतु जाहिरातीचा कोणताच परिणाम दिसून आला नाही की कुणाचा फोनही आला नाही. राजाभाऊ थोडे नाराज झाले.

दोन दिवसांनी त्यांच्या ऑफिसमधील विमल वझे भेटल्या. त्या राजाभाऊंच्या हाताखाली काम करत असत. विमलताईंनी राजाभाऊंना विचारले, 'का हो राजाभाऊ, तुम्ही बंगला विकत हवा अशी जाहिरात वर्तमानपत्रात दिली होती ना?'

'हो.'

'मिळाला का बंगला?'

'नाही हो.' राजाभाऊ म्हणाले.

'माझ्या मैत्रिणीचा एक बंगला गेले दोन वर्षे बंदच आहे. तो विकायचा आहे. पण त्या बंगल्याबाबत असे कळले, की मैत्रिणीच्या नवऱ्याने त्याच बंगल्यात स्वत:वर गोळी झाडून घेतली होती. फार रागीट होता तिचा नवरा. मग ती मैत्रीण दिल्लीला बहिणीकडे गेली व तेथेच तिला नोकरी मिळाली आहे.'

'तुमच्या मैत्रिणीला विचारा तर!'

'हो, पण असा बंगला तुम्हाला चालेल ना?' विमलताईंनी विचारले.

'अहो मला चालेल. मला भीती वगैरे काही वाटत नाही. फक्त बंगला शांत व एकांत वातावरणात असावा.'


'तसाच आहे तो 'प्रांजल' नावाचा बंगला.'

सर्व व्यवहार यथास्थित पार पडले व राजाभाऊ 'प्रांजल' बंगल्यात राहावयास आले. बंगला छोटासाच पण हवेशीर आणि टुमदार होता. तो गावाच्या अगदी बाहेर व टेकडीच्या पायथ्याशी होता. आसपास सगळी गुलमोहरची झाडं असल्याने, लाल गालिच्यावर पेपरवेट ठेवावा तसा तो बंगला दिसायचा.

वीस लाखात हा बंगला राजाभाऊ देशपांडे यांना मिळाल्याने, सर्वचजण त्यांचा हेवा करू लागले. एका अभियंत्याने तर या बंगल्याची किंमत बत्तीस लाख रुपये केली होती. विमल वझेंनी मध्यस्थी करून दिल्लीच्या मैत्रिणीकडून हा बंगला अगदी स्वस्तात राजाभाऊंना मिळवून दिल्याने, राजाभाऊंनी विमलताईंना एक लाख रुपये बक्षीस दिले होते.

राजाभाऊ आता निवांत झाले होते. त्यांना संगीताची आवड होती. जुनी भावगीते, जुनी गाणी ऐकण्याचा त्यांना छंद होता. शिवाय ते छान व्हायोलिन वाजवत. एका रात्री जेवण झाल्यावर ते बंगल्याच्या गॅलरीत उभे राहून व्हायोलिन वाजवू लागले. त्याबरोबर बंगल्याचे गेट आपोआप उघडले गेले. व्हायोलिनचे स्वर आर्त व कातर होते. ते मालकंस राग वाजवत होते. गुलमोहरची झाडं स्तब्ध होती. जणू ते शांत वातावरण आज्ञाधारक होऊन वादन ऐकत होते.

इतक्यात बंगल्यात काहीतरी पडल्याचा आवाज राजाभाऊंना ऐकू आला. वादन थांबवून ते वरील मजल्यावरून दिवाणखान्यात आले पहातात तो टिपॉयवरची सुंदर फुलदाणी खाली पडली होती. ती फुटून तिच्या काचा इतस्तत: पडल्या होत्या. राजाभाऊंनी सर्व काचा गोळा केल्या व डस्टबिनमध्ये टाकल्या. इतक्यात लाईट गेली आणि मेणबत्ती लावण्यासाठी राजाभाऊ किचनकडे जात असतानाच त्यांच्या पायात काच घुसली. 'आई गंऽऽ' असा विव्हल स्वर त्यांच्या तोंडातून निघाला. ते तसेच लंगडत किचनमध्ये आले आणि काडेपेटी शोधून त्यांनी मेणबत्ती लावली. मग खुर्चीत बसून त्यांनी टाचेत घुसलेली काच ओढून काढली. बरेच रक्त आले. त्यांनी पाय दाबून धरला. मग खिशातून रुमाल काढून त्यांनी टाचेला आवळून बांधला व स्वस्थपणे पलंगावर पडून राहिले. मेणबत्तीचा मिणमिणता प्रकाश दिवाणखान्यात पसरला होता.




राजाभाऊ त्या बंगल्यात एकटेच. आसपास वस्ती नव्हती. ऐनवेळी कशाची गरज पडली तर



किराणा दुकान, डॉक्टर वा रिक्षा स्टॉपही जवळपास नव्हता. दुखरा पाय ठसठसत होता. राजाभाऊ वेदना सहन करीत तसेच पडून होते. महिन्यापूर्वीच त्यांनी या बंगल्याचा ताबा घेतला होता. म्हणजेच बंगल्याचे मालक झाले होते.

राजाभाऊ कॉटवर पडून असतानाच त्यांना 'मॅचऽऽ मॅचऽऽ' असा आवाज ऐकू आला म्हणून ते बेडरूममधून आवाजाचा कानोसा घेत दिवाणखान्यात आले. त्यांनी मेणबत्तीच्या उजेडात पाहिले. एक काळे गलेलठ्ठ मांजर राजाभाऊंचे सांडलेले फरशीवरचे रक्त मॅच् मॅच् करत चाटत होते. राजाभाऊ 'शूकऽऽ शूकऽऽऽ' असे म्हणताच ते मांजर उघड्या खिडकीतून बाहेर गेले. राजाभाऊ खिडकी बंद करण्यासाठी पुढे झाले. खिडकीतून ते बाहेर पाहत असतानाच बंगल्याचे लोखंडी ग्रीलचे दार आपोआप बंद होताना दिसले.

जखमेच्या ठसठशीमुळे राजाभाऊंना रात्रभर झोप आली नाही. पहाटे त्यांना झोप लागली होती. एवढ्यात त्यांच्या कानावर कुणाचे तरी ओरडणे आले. 'साहेबऽऽ अहो साहेबऽऽ' कोणीतरी हाका मारत होतं. राजाभाऊंनी खिडकीतून बाहेर पाहिले. एक वयस्कर कमरेत वाकलेला वृध्द हाका मारत होता.

राजाभाऊ बंगल्यातून बाहेर आले. त्यांनी विचारले, 'काय हो, का हाका मारता?'

'साहेब रात्रभर लाईट चालू आहे. आता सकाळचे आठ वाजलेत. हा बंगला दोन वर्षं बंद होता. म्हटलं कोण राहायला आले ते तरी पाहूया.'

'नाव काय तुमचं?'

'नामदेव. पण सगळे नामूच म्हणतात. पूर्वी या बंगल्यात सारंग साहेब रहात होते. त्यांच्याकडे मी या बंगल्यात नोकरीला होतो.' नामू म्हणाला.

'या आत या.'

'मला अहो-जाहो करू नका. नामा किंवा नामूच म्हणा. नामदेव म्हटलं तरी उगाच कुणी अंगावर आल्यासारखं वाटतं.'

'पण तुम्ही माझ्यापेक्षा वयस्क.'

'नामूचा म्हणा. तेच मला गोड वाटतं.' दोघे बोलत बोलत बंगल्यात आले. राजाभाऊ खुर्चीवर बसले. नामदेव दोन पायावर चवड्यावर बसला. धोतर-सदरा असा त्याचा वेश होता. नामदेव दिसायला अगदी गबाळा होता.

'म्हणजे या बंगल्याची तुला सर्व माहिती असणारच?' राजाभाऊंनी प्रश्न केला.

'होय तर. सारंग साहेबांनी अतिशय आवडीनं हा बंगला बांधला होता. सारंग साहेब खूप उदार स्वभावाचे होते. तेवढेच तापटही होते. त्यांना टापटीप आवडायची. त्यांच्या पत्नीचे नाव निर्मला. पण..'


'पण काय नामदेव?'

'निर्मला वाईट वर्तणुकीची होती. या नवरा बायकोंची एकदा भांडणं झाली अन् सारंग साहेबांनी डोक्यावर पिस्तूल झाडून घेऊन आत्महत्या केली. मग निर्मलाबाई दिल्लीला गेल्या. माझी नोकरी गेली.'

'घाबरू नको नामू. तू आजपासून माझ्याकडे नोकरीस रहा.' राजाभाऊ म्हणाले. राजाभाऊंना सोबत मिळाली होती. नामदेवला रिक्षा आणायला सांगून राजाभाऊ दवाखान्यात गेले. डॉक्टरांनी त्यांच्या पायाला ड्रेसिंग करून काही गोळ्या लिहून दिल्या. दोघे परत बंगल्यावर आले.

नामदेव जेवण करत होता, शिवाय माळीकामही तो चांगले करायचा. सगळा बाजारहाटही तो करायचा. त्यामुळे राजाभाऊ निवांत झाले होते. ते दिवसभर वाचन करत. त्यांना रहस्यकथा खूप आवडायच्या. मग रोज संध्याकाळी गॅलरीत उभे राहून ते गुलमोहरांच्या झाडांकडे पहात डोळे झाकून व्हायोलिन वाजवत उभे राहात.

एकदा संध्याकाळचे असेच तल्लीन होऊन डोळे झाकून ते व्हायोलिन वाजवत असतानाच एक क्रुद्ध, चिडलेला चेहरा त्यांच्या डोळ्यापुढं दिसू लागला. तो चेहरा जणू डोळ्यातून अंगार ओकत होता. राजाभाऊंनी डोळे उघडले आणि त्यांना कुणीतरी पाठीमागून धक्का दिला. राजाभाऊ ग्रीलला टेकून व्हायोलिन वाजवत असल्यामुळे धक्का बसताच त्यांचा तोल गेला व ते खाली कोसळणार एवढ्यात त्यांनी ग्रील पकडला. त्यामुळे ते लोंबकळत राहिले.



'नामाऽऽ नामाऽऽ' त्यांनी जोरात हाक मारली. नामदेव धावत आला. त्याने हात देऊन लोंबकळणाऱ्या राजाभाऊंना वर घेतले. राजाभाऊ मनातून दचकले. आपल्याला धक्का दिला की आपण वाजवण्याच्या नादात पडलो, हेच त्यांना कळेना. धक्का दिल्याचे त्यांना आठवत होते. पण धक्का देणारा तर दिसलाच नव्हता.

रात्रभर राजाभाऊ याच गोष्टीचा विचार करत पलंगावर पडून होते. रात्रीचे बारा वाजले. घड्याळात

टोल पडत होते. 'टण् टण् टण्...' मनातल्या मनात राजाभाऊंनी टोल मोजले. इतक्यात लाईट गेली. बंगल्यात अंधार झाला. राजाभाऊ वैतागले. ते तसेच पडून कानोसा घेत राहिले. बाहेर वाऱ्याचा सूंऽऽ सूंऽऽ आवाज येत होता. एक खिडकी उघडी राहिली असावी. ती सारखी आपटून उघडझाप करत होती. राजाभाऊंना जाणवले आपल्या पायाला बँडेज केले आहे, ते कोणतरी चावत आहे. त्यांनी उशाखालची बॅटरी पेटवली व पायावर फोकस धरला, तर काळे मांजर पाय चाटत होते. बँडेज चावत होते. रक्त मिळावे म्हणून...

राजाभाऊंनी उघडा पाय चादरीत घेताच मांजराने 'म्याँव' असा आवाज काढला. त्याचे पिवळेजर्द डोळे राजाभाऊंवर रोखले गेले होते. राजाभाऊ धडपडून उठले व 'शुकऽऽ शुकऽऽ' करून त्यांनी मांजराला हाकलले. ते उघड्या खिडकीतून बाहेर पडले. राजाभाऊंनी खिडकी बंद केली. नामदेव रात्री जेवण करून आपल्या घरी नऊ वाजता जात होता.

दोन दिवसांनी राजाभाऊंचा पाय बरा झाला. ते टाच जमिनीला टेकवू लागले. त्यांना गुलमोहरांच्या झाडांची खूप आवड होती. रक्तवर्णी व तांबूस फुला-पाकळ्यांनी उगवलेले जवळजवळ वीस-पंचवीस गुलमोहरांची झाडं त्या टेकडावर होती. त्यामुळे त्या टेकडीला कुणीतरी नक्षीदार साडी नेसवली असावी असे वाटत होते.

राजाभाऊंनी आधारासाठी एक काठी घेतली व ती टेकवत टेकवत ते बंगल्याबाहेर पडले. जाताना ते नामदेवाला म्हणाले, 'नामा मी जरा आसपास फिरून येतो. तास-दोन तासांनी येईन. तू कुठं जाऊ नकोस. जेवण कर.'

'बरं मालक.' म्हणून नामदेव गप्प झाला होता.

राजाभाऊ काठी टेकत हळूहळू चालत खाचाखळग्यातून चढत टेकडीवर आले. त्यावेळी दुपारचे चार वाजले होते. त्यांनी सभोवार पाहिले. खूप आल्हाददायक वातावरण होते. राजाभाऊंचे लक्ष एका झाडाखाली गेले. तेथे एक चित्रकार चित्र काढण्यात दंग झाला होता. राजाभाऊ हळूहळू चालत त्या चित्रकाराजवळ गेले. चित्रकाराने त्यांच्याकडे पाहून स्मितहास्य केले. चित्रकार तरुण होता. आणि तो राजाभाऊंच्याच बंगल्याचे व आसपासच्या वृक्षांचे चित्र काढत होता.

'माझ्याच बंगल्याचे चित्र काढत होता वाटतं?' राजाभाऊंनी आश्चर्याने विचारले.

'सॉरी हं!' पण हा बंगला निर्मला सारंग यांचा होता ना?' चित्रकारानेच उलट विचारले.

'हो. मी त्यांच्याकडूनच विकत घेतला आहे. निर्मला सारंग त्यावेळी इथं आल्या होत्या. त्यांनीच बंगला उघडून माझ्या ताब्यात दिला.'

'हो असेल तसंही. मी त्यावेळी चित्रप्रदर्शनासाठी मुंबईला गेलो होतो.'

'तुमची त्यांची ओळख आहे?'

'हो आहे.. म्हणजे होती. आता त्या इथं नाहीत.'



'चला या निमित्तानं एक देखणा, तरुण, सुंदर चित्रकार मित्र मिळाला.'

'धन्यवाद! तुमची ओळख!'

'मी राजाभाऊ देशपांडे. निवृत्त तहसीलदार आहे. मुलगा अमेरिकेत स्थायिक झालाय. पत्नी वारली. मी एकटाच राहातो या बंगल्यात.'

'मुलाकडं अमेरिकेत जायचं.'

'मला शक्य नाही. ती संस्कृती वेगळी, आपली वेगळी. माझं माझ्या देशावर प्रेम आहे.'

'छान. बरं वाटलं ऐकून. माझं नाव श्रीरंग शेलार. चित्रकार आहे मी. थोडंफार नाव आहे माझं या चित्रकला क्षेत्रात.'

'तुमचं लग्न झालं?'

'नाही मी पण एकटाच राहतो. इथून दोन मैलावर अशाच एकांतात माझा बंगला आहे. येता का माझ्याबरोबर?'

'आलो असतो, पण माझ्या पायात काच घुसलीय. बँडेज केलंय.'

'अहो माझ्याकडे स्कूटर आहे. फुर्रकन जाऊ आणि परत आणूनही सोडतो. मग काय हरकत आहे?'

'चला, पण तुमचं चित्र अर्धवट राहील ना.'

'अशी कित्येक चित्रं अर्धी राहातात. ती नंतर पूर्ण करता येतात की.' श्रीरंग शेलार हसत म्हणाला. काही वेळाने दोघेही टेकडीवरून खाली आले. श्रीरंगने स्कूटरला किक् दिली. दोघे स्वार झाले. पंधरावीस मिनिटात ते दोघे एका बंगल्याच्या दारात आले. राजाभाऊंचं लक्ष बंगल्याकडं गेलं. बंगला सुंदर होता व बंगल्याला नाव होतं– 'निर्मला.'

श्रीरंगने कुलूप उघडलं. दोघे बंगल्यात आले. राजाभाऊ भिंतीवरील चित्रं पाहू लागले. अगदी जिवंत वाटावीत अशी ती चित्रं होती.

'चहा घेणार की कॉफी?' श्रीरंगने विचारले.

'कॉफी चालेल.' राजाभाऊ म्हणाले.

श्रीरंग कॉफी बनवायला आत गेला. राजाभाऊ चित्र पहात होते. एक तरुणी डोक्यावर गवताचा भारा घेऊन चाललीय, तिच्यामागे एक शेळी चाललीय हे चित्र अप्रतिम होते. दुसरे चित्र एक तरुणी मोकळे केस सोडून खांबाला टेकून पाठमोरी उभी आहे. उन्हात तिचे पिंगट केस चमकताहेत. एक घार आकाशात उडत आहे. खाली सुंदर सरोवरं आहेत. भोवती झाडं आहेत अशी ती तीन चित्रे दिवाणखान्यात होती. राजाभाऊ कोचावर येऊन बसले व दुरून ती चित्रे पहात असतानाच चित्रातली शेळी अचानक धावत गेली व तिच्यामागे ती तरुणी धावत गेली. त्यामुळे फक्त निसर्गचित्र राहिले.

राजाभाऊंना घामच फुटला. त्यांनी केस मोकळ्या सोडलेल्या तरुणीच्या चित्राकडे पहात असतानाच त्या तरुणीने तोंड वळवले व राजाभाऊंकडे हसून पाहिले. ती तशीच स्तब्ध उभी राहिली.

राजाभाऊंनी तिसऱ्या चित्राकडे पाहिले. आकाशातली घार भर्रकन् सरोवराकडे झेपावली आणि तिने एक मोठा मासा पायात पकडला व पंख हलवत आकाशात गेली. तिच्या झेपावण्याने पाण्यावर तरंग उठले होते. तो मासा तिच्या पंजात तडफडत होता. घार फार उंच गेली. ते चित्र, पुन्हा पहिल्यासारखे झाले.

'ही चित्रं जिवंत कशी काय झाली? की भास झाला?' अशा विचारात कपाळावरचा घाम रुमालाने टिपत राजाभाऊ बसले असतानाच कॉफीचे दोन मग घेऊन श्रीरंग आला व राजाभाऊंच्या शेजारी कोचावर बसला. त्याने एक मग राजाभाऊंना दिला व त्यांना अस्वस्थ पाहून विचारले,

'बरं वाटत नाही का?'

'तसं काही नाही. पण ही चित्रं...'

'आवडली ना?'

'चित्रं छान आहेत हो. पण या निसर्ग चित्रात गवताचा भारा घेऊन जाणारी एक तरुणी व तिच्यामागून येणारी एक शेळी होती. ती त्या चित्रातून गायबच झाली.'

'छे हो. हे निसर्गचित्रच आहे. शेळी आणि तरुणी मी चितारलीच नव्हती.'

'मग या चित्रातली तरुणी पाठमोरी होती. आता तिनं चेहरा पुढं केला. मला पाहून हसली.'

'तुम्हाला काहीतरी भास झाला असेल.' श्रीरंग म्हणाला.

'ही या चित्रातली घारही त्या सरोवरातून मासा उचलून वर गेली.'

'कमाल करताय राजाभाऊ तुम्ही. रहस्यकथा लिहिता की वाचता?'

'अहो मी खरंच बोलतोय. असंच घडलं माझ्या डोळ्यादेखत.'

'चित्रं मी काढलीत न् त्याचा तपशील सांगता तुम्ही. सगळंच अजब म्हणावं लागेल.'

राजाभाऊंनी कॉफी संपवून मग टीपॉयवर ठेवला. श्रीरंगने त्यांना वरच्या मजल्यावर नेले. श्रीरंगने एका स्त्रीचे छान चित्र काढले होते. ते स्टँडवर तसेच होते.

'यांना मी ओळखतो. ही निर्मला सारंग ना?'

'हो.'

'आणि ते चित्र पहा.' म्हणत श्रीरंगने एका फ्रेमकडे अंगुलीनिर्देश केला.

'अरे हा चेहरा.... कुठंतरी पाहिलाय्....' राजाभाऊ नकळत बोलून गेले.

'हे सारंगसाहेब. प्रांजल बंगल्याचे पूर्वीचे मालक.' श्रीरंग म्हणाला.

'तुमची व त्यांची ओळख होती?'

'हो. सारंग यांच्याशी माझी ओळख वाढली. मी प्रांजल बंगल्यात त्यांना भेटायला येत-जात होतो. पुढे त्यांची पत्नी निर्मला हिच्याशीही माझी ओळख झाली होती. सारंग तापट होता. मी वरचेवर बंगल्यावर येतो याचा त्यांनी भलताच अर्थ घेतला होता.'

'मग?'

'मग काय एकदा त्यांनी रागाच्या भरात स्वत:वर पिस्तुल झाडून घेतलं.'

'अरे रे!'

'तुम्हाला का वाईट वाटलं. तुमची तर त्यांच्याशी ओळखच नव्हती.' श्रीरंग जरा रागानेच म्हणाला.

'कुणाही माणसाचं असं होऊ नये. एवढा राग बरा नाही.'

'झालं ते झालं राजाभाऊ.' म्हणत श्रीरंगने मग उचलले व आत निघून गेला.

तेव्हा राजाभाऊंच्या पटकन् लक्षात आले की, हाच लाल चौकड्याचा शर्ट घातलेली व्यक्ती म्हणजे सारंग व्हायोलिन वाजवताना डोळ्यापुढे दिसत होते. आणि धक्का देताना किंचित दिसलेला हात व त्या हातावर हाच लाल चौकड्याचा शर्ट होता.

राजाभाऊंना घाम फुटला. ते श्रीरंगला ओरडून म्हणाले, 'श्रीरंग अहो, मला पोचवताय ना?'

पण काहीच आवाज आला नाही. राजाभाऊ किचनमध्ये गेले. तर तिथं दोन मग ठेवलेले तेवढे दिसले. कुठं गेला हा श्रीरंग शेलार म्हणत राजाभाऊ वळत होते. तेवढ्यात श्रीरंग हसत आला व म्हणाला, 'राजाभाऊ चला लवकर. मला ताबडतोब दिल्लीला जायचे आहे. आताच निर्मलाचा फोन आला होता.'

'फोन? मला मग फोनची रिंग कशी ऐकू आली नाही? तुम्ही कोठे बाहेर गेला होता का इतक्यात?'

'फार प्रश्न विचारू नका. चला बसा स्कूटरवर मी बंगल्याला कुलूप लावून येतो.' म्हणत श्रीरंगने राजाभाऊंना गडबडीने बंगल्याबाहेर काढलं. बंगल्याला कुलूप लावून श्रीरंग